# समाजात वावरत असताना स्वतःचा बचाव स्वतः करणे गरजेचे आहे. : कु. सरिता शेवाळे



कॉलेजमध्ये लाठीकाठीचे प्रात्यक्षिक दाखविताना कु. सरिता शेवाळे सोबत सर्व विद्यार्थीनी.

आज समाजात मुलींचे जीवन असुरक्षित झाले आहे. त्यामुळे समाजात वावरत असताना स्वतःचा बचाव स्वतः करणे गरजेचे आहे. त्यासाठी ज्युदो ,कराटे, लाठीकाठीचे प्रशिक्षण घेऊन स्वतःचे संरक्षण स्वतः करणे गरजेचे आहे असे प्रतिपादन बी.ए.भाग -३ ची विद्यार्थीनी कु. सरिता शेवाळे हीने केले. श्रीपतराव चौगुले आर्टस अँण्ड सायन्स कॉलेज , माळवाडी -कोतोली, ता. पन्हाळा येथील आयक्युएसी , हिंदी विभाग व अंतर्गत तक्रार समिती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या ज्युदो प्रशिक्षण प्रसंगी कु. सरिता शेवाळे बोलत होती. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्र. प्राचार्य डॉ.बी.एन.रावण होते. यावेळी कु. शेवाळे हीने ज्युदो कराटे व लाठीकाठीची प्रात्यक्षिके दाखविली. कार्यक्रमास संस्थेचे सचिव मा. शिवाजीराव पाटील , श्री.ए.आर. महाजन, श्री.यु.एन. लाड श्रीमती यु. यु. पाटील सर्व शिक्षक , कर्मचारी, विद्यार्थी, माध्यमिक विद्यालयाच्या इ.८ वी व ९ वी च्या विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत डॉ. श्रीमती व्ही. पी. पाटील यानी केले तर आभार डॉ.एम.के. कांबळे यानी मानले.